# Punyanagari

## Chola Investment net profit

**Date: 05/02/2016 | Edition: Pune | Page: 8 | Source: Bureau | Clip size (cm): W: 5 H: 6**

**Clip: 1 of 1**


### चोला इन्व्हेस्टमेण्टच्या नफ्यात वाढ

**मुंबई** : चोलामंडलम इन्व्हेस्टमेण्ट ॲण्ड फायनान्स कंपनी लिमिटेडने (चोला) ३१ डिसेंबर २०१५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे वित्तीय निकाल जाहीर केले. यामध्ये करपश्चात नफा १४६ कोटी रुपयांवर पोहचला असून मागील वर्षाच्या तुलनेत यामध्ये ३१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच पॅट ३७६ कोटी रुपयांवर असून यामध्ये २६ टक्क्यांची वाढ झाली आहे. व्यवस्थापनांतर्गत असलेल्या एकूण मालमत्तेने ३०,००० कोटी रुपयांचा आकडा ओलांडला आहे. या तिमाहीत नेट इन्कम मार्जिनमध्ये (एनआयएम) १७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्याच्या तिमाहीत चोलाचे नेट इन्कम मार्जिन ८.८ टक्के होते, जे गेल्या वर्षी याच कालावधीत ८.२ टक्के होते.